डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६२ /२०२६ दि. १६/०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे अंतर्गत राजाजी पथ गल्ली नं.२ व ३, डोंबिवली पुर्व हे रस्ते महत्वाचे असुन ते इतर रस्त्यास जोडले जात असतात. अनेक वाहन चालक त्यांची वाहने सदर सार्वजनिक रस्त्यांवर अनावश्यकरित्या व बेशिस्तीने उभी करुन ठेवत असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. संभाव्य वाहतुक कोंडी टाळण्यासाठी राजाजी पथ गल्ली नं.२ व ३ या सार्वजनिक रस्त्यास जोडणाऱ्या रस्त्यावर नो पार्किंग करणे व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातुन आवश्यक असल्याचे याबाबत केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत आढळुन आले आहे. असे न केल्यास वाहतुक कोंडी होणे अथवा अपघात होऊन जिवीत व वित्तहानी होण्याची स्थिती निर्माण होईल व प्रसंगी आपत्कालीन परिस्थितीत वाहतुक कोंडी सोडविणे व अपघातग्रस्तांना मदत पुरविणे अशा आपत्कालीन परिस्थितीत मोठ्या समस्या व अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

अ.क्र.	ठिकाण	प्रकार	अंतर	वेळ
१	राजाजी पथ गल्ली नं.२ व ३ या सार्वजनिक रस्त्यांस जोडणाऱ्या अमर शाम बिल्डीग ते राजाजी पथ गल्ली नं. २ **(रस्त्याच्या दुतर्फा नो पार्किंग)**	नो पार्किंग	५० मीटर	२४ तास
२	राजाजी पथ गल्ली नं. ३ ते श्री रघुनाथ को.हौ. सोसा. पर्यंत राजाजी पथ तिसरी क्रॉस लेन	नो पार्किंग	४५ मीटर	२४ तास
३	राजाजी पथ गल्ली नं.२ ते पाटकर शाळा मुख्य प्रवेशव्दार चिंतामणी बिल्डीग पर्यंत	नो पार्किंग	३० मीटर	२४ तास

वर नमूद ठिकाणी **नो पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.